# "आपलं पाणी" प्रकल्प टप्पा २ जिल्हा परिषद, अहमदनगर

आपलं पाणी टप्पा २ हा फेब्रुवारी २००७ पासून जलस्वराज्य प्रकल्पाचे धर्तीवर राबविणेत येत आहे. गावांच्या मागणी नुसार व शासनाचे निकषानुसार अंतिमतः जिल्ह्यातील ८८ गावांची दुस-या टप्प्यासाठी निवड करण्यात झाली. निवड झालेल्या ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यांच्यात सर्वसमावेशक आर्थिक करार झाला असनू प्राथमिक क्षमता बांधणी निधी म्हणून गावांना ४०,०००/- रुपयांचा निधी देण्यात आला. आपलं पाणी प्रकल्प गावाने स्वीकारला पण तो राबविण्याबाबत गावाची मानसिकता तयार करणे गावाची प्राथमिक क्षमता बांधणी करणे यासाठी हा निधी खर्च करण्यात येतो.यात गावातील काही अभ्यासू लोकांचा अभ्यासदौरा आयोजीत करण्याची तरतूद आहे. ज्या गावाने आपलं पाणी प्रकल्प यापूर्वी राबविला आहे अथवा लोकसहभागातनू गावाचा विकास साधला आहे, अथवा ग्राम स्वच्छता अभियानात क्रमांक मिळविला असेल अशा गावांत जाऊन अभ्यास करणे व त्यादृष्टीने आपल्या गावात आमुलाग्र बदल घडवनू आणणे यातून अपेक्षीत असते. अहमदनगर जिल्ह्यातील राळेगण सिद्धी, हिवरे बाजार , वडगांव आमली व येसगांव या आदर्श गावांत अभ्यास दौरे आयोजीत करणेत आलेले आहेत. माहिती, शिक्षण व संवादाचा भाग म्हणनू स्वागत फलक तयार करणे, म्हणी लिहीणे, कलापथकांव्दारे लोकजागृती करणे , विविध मार्गदर्शनात्मक सीडी दाखविणे, कार्यशाळा घेणे, कॉर्नर बैठका घेणे, ग्रामसभा घेणे, पीआरए करणे अशा वेगवेगळ्या माध्यमांतनू प्रकल्प यशस्वीरित्या राबविणेकरीता लोकांची मानसिकता तयार करण्यासाठी सहाय्यकारी संस्था यांची निवड करणेत आली आहे.

सध्या प्रकल्प नियोजनाच्या टप्प्यात असून जवळ जवळ सर्वच गावांत ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती , सामाजिक लेखा परीक्षण समिती अशा समित्याही स्थापन झाल्या आहेत. आता या प्रकल्पातील महत्वाचा भाग म्हणजे उपप्रकल्प १ व २ चे नियोजन सुरु आहे.यात समित्या

## गावाच्या विकासात , शासनाचा सहभाग




आपलं पाणी टप्पा २ मधील लाभार्थी ग्रामस्थांचा आदर्श गांव हिवरे बाजार ता.नगर येथे अभ्यास दौरा



प्रकल्पातंर्गत घरगुती नळ जोडणीव्दारे पाणी पुरवठा.

| | |
|---|---|
| सदस्यांना प्रकल्प योग्य रितीने पुर्ण करणे व त्याची देखभाल दुरुस्ती करुन पाणी पुरवठा योजना शाश्वत चालविण्यासाठी प्रशिक्षण देणे तसेच त्यांची क्षमता बांधणी करणे हे अपेक्षीत आहे. त्यादृष्टीने आपलं पाणी जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष चा चमु कामात गुंतला आहे. उपप्रकल्प २ हा अंमलबजावणी टप्पा असुन प्रस्तावित गावासाठी पाणी पुरवठा सुविधा पुरविणेसाठी आराखडा व अंदाजपत्रके तांत्रिक सेवा पुरवठादार यांचेमार्फत तयार करणेत आलेले आहेत.सदर उपप्रकल्प - २ ची प्रशासकीय मंजूरी ही त्या गावच्या ग्रामसभेने द्यावयाची आहे व त्यास तांत्रिक मंजूरी ही जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षाने द्यावयाची आहे. सदर उपप्रकल्प आराखडयाच्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या १० टक्के एवढी लोकवर्गणी पुर्ण होणा-या गावांत एकूण अपेक्षीत खर्चाच्या ४५ टक्के प्रथम हप्ता निधी संबंधीत गावांच्या ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या खात्यावर वर्ग करण्यात येत आहे. अपेक्षित लोक वर्गणीच्या ५० टक्के पेक्षा जास्त लोकवर्गणी जमा करणा-या गावांना उपप्रकल्प १ अंतर्गत क्षमता बांधणी निधी ४५ टक्के देणेत येत आहे. या निधी मध्ये ग्रामपंचायत बळकटीकरण व विविध प्रशिक्षणे यांचा समावेश आहे. उपप्रकल्प १ व उपप्रकल्प २ च्या प्रस्तावित खर्चाचा निधी गावास वितरीत केल्यानंतर सदरचा खर्च हा ग्रामसभेमध्ये मांडून त्यास ग्रामसभेची मंजूरी घेणे बंधनकारक असल्याने हा प्रकल्प पारदर्शकपणे राबविणेत येईल. | |